# MAHARASHTRA TIMES

महाराष्ट्र टाइम्स

02.11.2017


## ग्रामीण भागात डॉक्टरांना पदनियुक्ती नाही

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

कोणत्याही क्षेत्रातील तज्ज्ञांना उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्या क्षेत्रात काम करण्याचा व पैसे मिळवण्याचा अधिकार आहे. वैद्यकीय शिक्षण संचालनालयाकडे ग्रामीण भागात काम करण्यासाठी पदनियुक्तीची (पोस्टिंग) मागणी करूनही जागा दिल्या जात नसतील तर त्यात डॉक्टरांचा काय दोष, अशी विचारणा बिइंग डॉक्टर या सामाजिक संस्थेने केली आहे. डॉक्टरांच्या मुद्द्यांवर काम करणाऱ्या या संस्थेने ग्रामीण भागात काम करायला डॉक्टर तयार होत नाहीत, हा वैद्यकीय शिक्षण संचालनालयाचा आरोप खोडून काढला आहे.



बिइंग डॉक्टर संस्थेचा आरोप

मागील काही वर्षांमध्ये पदव्युत्तर वैद्यकीय प्रशिक्षण घेतलेल्या डॉक्टरांनी स्वत:हून ग्रामीण भागामध्ये पोस्टिंग मिळण्याबद्दल विचारणा केली होती. वैद्यकीय शिक्षण संशोधन व संचालनालयाकडून यासंदर्भात कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. तोंडी वा लेखी आश्वासनही देण्यात आले नाही. त्यामुळे एका कालावधीसाठी वाट पाहून या डॉक्टरांनी स्वत:ची प्रॅक्टिस सुरू केली. या प्रॅक्टिसच्या माध्यमातूनही ते रुग्णांना तसेच गरजूंना सोयीसुविधा देतात हे सरकार कसे नाकारणार, असा प्रश्न संस्थेचे अध्यक्ष डॉ. पंकज चतुर्वेदी यांनी उपस्थित केला आहे.

राज्य सरकारने अनेक चांगल्या योजना गोरगरीब रुग्णांसाठी राबवल्या, पण या योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसेल तर त्याचा काय फायदा, असा प्रश्न संस्थेच्या सचिव डॉ. निलिमा वैद्य-भामरे यांनी उपस्थित केला आहे. डॉक्टर कसे स्वार्थी आहेत व ते ग्रामीण भागामध्ये जाऊन सोयीसुविधा देत नाहीत, असे चित्र निर्माण केल्यामुळे डॉक्टरांची प्रतिमाही डागाळली जात आहे. पदव्युत्तर डॉक्टरांना दोन कोटी रुपयांपर्यंतची दंडात्मक रक्कम आकारण्यात आली आहे. या कायदेशीर कारवाईमुळे प्रामाणिकपणे ग्रामीण भागात सेवा देऊ पाहणाऱ्या डॉक्टरांचे मनोबल खच्ची होण्याची शक्यता आहे, असेही संस्थेचे म्हणणे आहे.

### आरोपांत तथ्य नाही

बिइंग डॉक्टर या संस्थेने घेतलेल्या आक्षेपासंदर्भात वैद्यकीय संशोधन व संचालनालयाचे संचालक डॉ. प्रवीण शिनगारे यांच्याकडे विचारणा केली असता ते म्हणाले की, या आरोपामध्ये कोणतेही तथ्य नाही. ज्या डॉक्टरांकडे अशी विचारणा केल्याचे लेखी पुरावे, तक्रारी आहेत त्यांनी त्या सादर केल्यास यासंदर्भात चर्चा करण्यात येईल, असे सांगून त्यांनी हे आरोप नाकारले.